# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगा घरोघरी

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ नाशिक - ४२२ २२२. वेबसाईट : http://www.ycmou.ac.in

दूरध्वनी०२५३-२२३०२२८ फॅक्स :- २२३१२०५

---

**प्रसिद्धीपत्रक वृत्त क्रमांक- १२४** **दिनांक : १८ एप्रिल २०१७**

## मुक्त विद्यापीठ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचा उपक्रम

## आंबेडकरांचे विचार कृतीत उतरविण्याची गरज- डॉ. प्रल्हाद लुलेकर

**नाशिक** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार विश्व समग्र होते. त्यांनी पाणी, उर्जा, जलमार्ग, कृषी, आर्थिक, पर्यावरण, सामाजिक न्याय, राष्ट्रवाद अशा विविध विषयांवर मुलभूत विचार मांडले.आपल्या समृद्ध विचारांनी समाजातील सर्व घटकांना हक्क मिळवून देतानाच नवी दिशा देण्याचे काम केले.यामुळे त्यांचे समग्र विचार कृतीत उतरवून स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मुलतत्वे प्रत्यक्ष कृतीतउतरविण्याची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन ख्यातनाम साहित्यिक, समीक्षक डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाच्या वतीने 'दलितेतरांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन होते यावेळी व्यासपीठावर कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख प्रा. नागार्जुन वाडेकर होते.

डॉ. प्रल्हाद लुलेकर म्हणाले, शेतकरी, कष्टकरी, कामगार, शोषित यांच्यासाठी बाबासाहेबांची अवघे जीवन वेचले. ग्रामीण जीवनाच्या उदात्तीकारणातून प्रश्न सुटणार नाहीत. डॉ. आंबेडकरांनी आयुष्यभर समाजातील वंचित, शोषित, पिडीत घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले हिंदू कोड बील आणि इतर मागास प्रवर्ग निर्माण करण्याची प्रक्रिया सुरु न झाल्याने त्यांनी प्रसंगी कायदे मंत्रीपदाचा राजीनामा दिला. ओबीसींच्या आजच्या सर्व चळवळींना डॉ. आंबेडकरांचे विचार उर्जादेत असल्याचे सांगितले. महिलांना त्यांचे हक्क, स्वातंत्र्य मिळवून देण्याबरोबरच त्यांना स्वातंत्र मिळवून देण्यासाठी दिलेले योगदान कधीही विसरता येणार नसल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन म्हणाले, डॉ. आंबेडकर यांनी भारताच्या आर्थिक व्यवस्थेचे मूलगामी चिंतन केले. त्यांनी विद्यापीठ स्तरावर बौद्धिक आणि व्यावसायिक स्तरावर मिळवलेले यश त्यांच्या कठोर मेहनतीतूनच मिळवले होते. त्यांनी जन्मभर समाजातील वंचित, शोषित, पिडीत घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. प्रारंभी कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख प्रा. नागार्जुन वाडेकर यांनी प्रास्ताविक केले. मनीषा खरे यांनी आभार मानले.

कार्यक्रमास विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांचे संचालक, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**फोटो ओळ :** ३४६८/३४७० - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाच्या वतीने आयोजित केलेल्या 'दलितेतरांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावरील व्याख्यानात बोलताना ख्यातनाम साहित्यिक, समीक्षक डॉ. प्रल्हाद लुलेकर. व्यासपीठावर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन, कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख प्रा. नागार्जुन वाडेकर.

**संतोष साबळे**

प्रभारी प्रमुख जनसंपर्क विभाग ,

---

मा,संपादक .

कृपया सदरची बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्ध करावी ही विनंती कळावे,

आपला विश्वासू

**डॉ दिनेश भोंडे .**

कुलसचिव,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविद्यापीठ